**ज्ञान प्रबोधिनी प्रशाला**
**५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०**

---

**पालकांसाठी सूचना**
**(इ. ५वी २०२५-२६)**

1. सोबतच्या यादीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींची इयत्ता ५वीतील प्रवेशासाठी त्यांच्या गुणवत्तेनुसार निवड झाली आहे. मात्र प्रवेश घेतेवेळी सांगितलेल्या नियमांपेक्षा वेगळी वैयक्तिक माहिती आढळल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

2. शनिवार दि. २२ मार्च रोजी संध्याकाळी ६.३० वाजता प्रवेशासंबंधी एक बैठक योजली आहे. त्यास सर्वांनी उपस्थित राहावे. पाल्यास सोबत आणू नये.

3. दि. २४ मार्च ते दि. ३१ मार्च २०२५ या दरम्यान प्रशाला कार्यालयात प्रवेश अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर आपल्याला ईमेलने युजरनेम व पासवर्ड येईल. तो वापरून **jpp.etechschoolonline.com** या संकेतस्थळावर लॉग इन करून शुल्क रुपये १,२०,०००/- + ५,०००/- असे एकूण १,२५,०००/- (रु. एक लाख पंचवीस हजार मात्र) दि. १ एप्रिल ते दि. ५ एप्रिल या कालावधीत भरावयाचे आहे. शुल्क भरल्यानंतर आपल्या पाल्याचा प्रवेश फक्त राखून ठेवला जाईल.

4. दि. १० मे २०२५ पर्यंत पाल्याच्या इ. ४थीच्या गुणपत्रकाची व आधारकार्डाची छायामुद्रित प्रत, आधीची शाळा सोडल्याचा मूळ दाखला व एक प्रकाशचित्र असे कार्यालयात द्यावे. त्यानंतरच प्रवेश निश्चित होईल.

5. प्रवेशासाठी कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे असतील-
   सोमवार ते शुक्रवार, सकाळी ११.३० ते ४.३० व शनिवारी, सकाळी ८.३० ते १२.००

6. निवड झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे शुल्क दि. ५ एप्रिल २०२५ पूर्वी न भरल्यास दि. ७ एप्रिल पासून जशा जागा रिकाम्या असतील त्याप्रमाणे प्रतीक्षा यादीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना क्रमश: प्रवेश दिला जाईल.

7. शाळेच्या नियमांविषयी व गणवेशाविषयी सूचना प्रशाला कार्यालयात मिळतील.

8. परगावच्या ज्या विद्यार्थ्यांना सहनिवासात प्रवेश घ्यायचा आहे त्यांनी सहनिवासाचा स्वतंत्र अर्ज प्रशाला कार्यालयातून घेऊन जावा व तो भरून दि. ५ एप्रिलपूर्वी प्रशाला कार्यालयात जमा करावा.

9. सन २०२५-२०२६ या वर्षासाठी सहनिवास वार्षिक शुल्क रुपये ७२,०००/- (रु. बहात्तर हजार मात्र) आहे. ते दोन हप्त्यांत भरता येईल. अर्ज दिल्यानंतरच सहनिवास शुल्क प्रशालेच्या संकेत स्थळावरून भरता येईल. यंदाच्या वर्षी सहनिवासात पाच जागा शिल्लक असून सोबतच्या यादीतील प्राधान्यक्रमाप्रमाणेच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

10. **इ. ५वीची शाळा सोमवार, दि. ९ जून २०२५ रोजी सुरू होईल.**

(वाचं. मिलिंद नाईक)
प्राचार्य

**प्राचार्य**
**ज्ञानप्रबोधिनी प्रशाला**
**५१०, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.**